दि. १२.१२ .२०२४.

# टेलिमेडिसीन

राज्यातील ग्रामीण व आदिवासी जनतेसाठी विशेषज्ञमार्फत वैद्यकीय सेवा देण्यासाठी टेलिमेडिसीन हि वैद्यकीय क्षेत्रात झपाट्याने विकसित होत असलेली यंत्रणा आहे. विशेषतः या मध्ये टेलिफोन, इंटरनेट किंवा इतर संपर्काद्वारे वैद्यकीय माहितीची आदानप्रदान करणे शक्य होते.वैद्यकीय सल्ल्यासाठी कधीकधी दुर्गम भागातील आजारी रुग्णांचे निदान करण्यासाठी या सुविधेचा उत्तम उपयोग होतो. राज्यात सन २००७-०८ साली टेलिमेडिसिन सेवा सुरु करण्यात आली असून, सद्यस्थितीत २५ जिल्हा रुग्णालये,३७ उप-जिल्हा रुग्णालये आणि १२ ग्रामीण रुग्णालये येथे टेलिमेडिसीन सेवा सुरु आहे. सर्व रुग्णालये इंटरनेट सेवेच्या आणि इतर तांत्रिक उपकरणांच्या मार्फत ६ मेडिकल कॉलेज सोबत जोडण्यात आले आहे. जिल्हा रुग्णालये ,उप-जिल्हा रुग्णालये आणि ग्रामीण रुग्णालये येथील वैद्यकीय अधिकारी मेडिकल कॉलेज येथील तज्ञ आणि विशेषज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत रुग्णांना वैद्यकीय सल्ला प्राप्त करून देतात.

आयुष्मान भारत योजने अंतर्गत सन २०१९-२० मध्ये आयुष्मान आरोग्य मंदिर (उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि शहरी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र)येथे टेलिकन्सल्टेशन सेवा सुरु करण्यात आली आहे.केंद्र शासनाने प्रसारीत केलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार हब आणि स्पोक या मॉडेल चा वापर करून टेलिकन्सलटेशन सेवा सुरु करण्यात आली आहे. आयुष्मान आरोग्य मंदिर (उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि शहरी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र) यांना स्पोक असे संबोधले आहे तर हब हे सर्व जिल्हा रुग्णालये येथे सुरु करण्यात आले आहे. हब येथे पाच MBBS वैद्यकीय अधिकारी आणि तीन विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग तज्ञ, भिषक आणि बालरोग तज्ञ ) उपस्थित असतात. स्पोक येथील समुदाय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी हे हब येथील वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्फत आयुष्मान आरोग्य मंदिर येथे येणाऱ्या रुग्णांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, चॅट यांच्या माध्यमातून वैद्यकीय सल्ला देतात. वैद्यकीय सल्ला दिल्यानंतर त्यांना रुग्णांना इ-प्रिस्क्रिपशन दिले जाते.

केंद्र शासनाने टेलिकन्सलटेशन सेवा सुरु करण्याकरीता देशातील सर्व जनतेसाठी इ-संजीवनी नावाचे टेलिमेडिसीन अप्लीकेशन शॉर्टलिस्ट केले आहे. सदर अप्लीकेशन सी-डॅक, मोहाली यांनी तयार केले आहे.

टेलिमेडिसीन विभाग जिल्हा रुग्णालये,उपजिल्हा/ग्रामीण रुग्णालये येथे सुरु करण्यात आली आहे. तसेच उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि शहरी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे टेलिकन्सलटेशन सेवा सुरु करण्यात आली आहे.सदयस्थितीत **११,५९२** आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये टेलिकन्सलटेशन सेवा सुरू करण्यात आली आहे.

टेलिमेडिसीन व आयुष्मान आरोग्य मंदिर टेलिकन्सलटेशन सेवे द्वारे आजतागायत एकूण **९५,११,८१८** रुग्णांना वैद्यकीय सल्ला देण्यात आला आहे.

eSanjeevaniOPD
STAY HOME OPD




# इ-संजीवनी ओपीडी ऑनलाइन मोफत आरोग्यसेवा

राज्यात इ-संजीवनी ओपीडी ऑनलाइन टेलिमेडिसीन मोफत आरोग्यसेवा माहे एप्रिल २०२० मध्ये सुरू करण्यात आली आहे. या सेवे द्वारे रुग्णांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगचा वापर करून थेट घरबसल्या वैद्यकीय अधिका-यांशी आजाराबाबत सल्लामसलत करता येते. सदर सेवे मार्फत रुग्ण सर्व आजाराबाबत वैद्यकीय अधिका-यांशी सवांद साधू शकतात. तसेच कोवीड १९ साथीच्या आजाराने ग्रस्त असलेले रुग्ण जे घरी उपचार घेत आहेत किंवा विलगीकरण करण्यात आलेले रुग्ण देखील या सेवेचा लाभ घेऊ शकतात. या सेवेद्वारे आजतागायत **५,८७,२८५** रुग्णांना त्यांच्या आजारांवर मोफत वैद्यकीय सल्ला देण्यात आला आहे. इ-सजींवनी ओपिडी कार्यक्रमाद्वारेसामान्य,तज्ञओपिड(अस्थीरोग,नेत्ररोग,मानसोपचार,त्वचारोग,स्त्रीरोग, बालरोग,दंतरोग,नाक,कान,घसा,सामान्य चिकित्सा,सामान्य शास्त्रक्रिया,मेंदू विकार) आणि आयुष ओपीडी (आयुर्वेद,होमीओपॅथी,युनानी) सुरू करण्यात आली आहे. राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालये,उपजिल्हा रुग्णालये आणि ग्रामीण रुग्णालये येथील सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांची नोंदणी इ-संजीवनी ओपीडी ॲप्लिकेशन मध्ये करण्यात आली असून, दिवस ठरवून दिल्याप्रमाणे सर्व वैद्यकीय अधिकारी इ-संजीवनी ओपिडी मार्फत रुग्णांना त्यांच्या आजारावर सल्लामसलत करून त्यांना इ-प्रिस्क्रिपशन दिले जाते.

- **इ-संजीवनी ओपीडी ऑनलाइन सेवेचा वापर करण्यासाठी प्रक्रिया :-**
  - इ-संजीवनी ओपीडी ऑनलाइन टेलीमेडीसीन सेवेचा लाभ घेण्यासाठी https://esanjeevani.mohfw.gov.in/# या संकेतस्थळाचा वापर करून वैद्यकीय अधिका-यांशी सल्लामसलत करू शकतात.

- Android मोबाइल धारक play store मध्ये जाऊन देखील इ-संजीवनी ओपीडी ऑनलाइन ॲप डाऊनलोड करून वैद्यकीय अधिका-यांशी सल्लामसलत करू शकतात.

- **इ-संजीवनी ओपीडी ऑनलाइन वेळ :-**
  - सोमवार ते रविवार सकाळी ९:०० ते दुपारी १:०० वाजेपर्यंत आणि दुपारी १:४५ ते संध्याकाळी ५:०० वाजेपर्यंत आहे.(दररोज).

**पुढील तक्त्याप्रमाणे रूग्णांना वैदयकीय अधिका-यांसोबत संवाद साधता येतो.**

